# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १७.०८.२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

दिनांक १७ ऑगस्ट २०१८ रोजी (का.प.क्र.१७) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी १२-१५ वा वंदेमातरम् गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक भापसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ७. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ८. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ९. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १०. | स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| ११. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १२. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १३. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १४. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १५. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| १६. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| १७. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| १८. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| १९. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २०. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २१. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २२. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| २३. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| २४. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| २५. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| २६. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| २७. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| २८. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ३०. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ३१. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ३२. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ३३. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ३४. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३५. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ३६. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ३७. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ३८. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ३९. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ४०. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४१. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ४२. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ४३. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ४४. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ४५. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ४६. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ४७. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ४८. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ४९. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ५०. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ५१. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ५२. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ५३. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

मा.महापौर :देशाचे माजी पंतप्रधान मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे काल दु:खद निधन झाले. त्यांच्या प्रतिमेला पुष्पअर्पण करून व अभिवादन करून नंतर सभेचे कामकाज सुरू केले जाईल.

(या वेळी महापौर म्हणून उपमहापौर पद भार स्विकारतात. त्यानंतर पुन्हा मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे महापौर पदाचा पदभार दिला जातो पुन्हा काही वेळाने मा.महापौर श्री.नंदकुमार घोडेले हे पदाचा पदभार घेतात.)

मा.महापौर :समांतर जलवाहिनी पुनरूज्जीवन या विषयावर ही सभा होती. परंतु देशाचे माजी पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे निधन झाल्याने आजच्या सभेत

त्या प्रस्तावाबाबत चर्चा करू नये. पुन्हा तारीख ठरविण्यात येईल. फक्त श्रध्दांजली अर्पण करण्या संदर्भात जे मत व्यक्त करायचे ते बोलावे.

श्री.दिलीप थोरात :काल माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे निधन झाले. त्यांनी संघटना मोठी करण्यासाठी मोठे काम केले. त्यांचे विषयी अनेक अनुभव किस्से एकविले आहे. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण चालू असतांना त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुर्ण वेळ प्रचारक म्हणून काम सुरू केले. सर्वजण आपआपल्या अनुभव सांगत होते. त्यांनी संघाचे काम करीत असतांना त्यावेळी संघाचे प्रचारक श्री.भाऊरावजी देवरस यांनी त्यांचे कालावधीत सांगितलेली एक गोष्ट अशी की, अटलबिहारी वाजपेयी संघाचे संचालक म्हणून काम करीत असतांना त्यांचेकडे कुठलेही साधन सुविधा त्यांचेकडे नव्हत्या. श्री.भाऊरावजी समोर अटलबिहारी वाजपेयी आले, तेंव्हा त्यांचे पायात चप्पल नव्हती. त्यांना चप्पल घेण्यास तीन वेळेस पैसे दिले तरी त्यांनी चप्पल घेतली नाही. जे की, त्यांनी असे म्हटले की, जे लोकसंघात काम करीत आहे. त्यांना त्याच पैशात जेवण मिळाले तर चप्पल पेक्षा ते मोठे आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी संघाचे काम केले होते. प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी देशासाठी काम केले अविरत त्यांनी कष्ट केले. त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर :मा.अटलबिहारी वाजपेयी यांचे जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारी एक चित्रफित दाखवतो आहे. ते शांततेत पहावे.

(या वेळी मा.माजी पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे जीवन चरित्रावर चित्रफित द्वारे माहिती दिली जाते.)

श्री.रेणुकादास वैद्य :देशाचे तीन वेळेस पंतप्रधान राहीलेले नेते ज्यांनी या देशाला चांगल्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला होता. असे भारतरत्न आणि मा.माजी पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे काल दु:खद निधन झाले. अतिशय सामान्य कुटूंबातुन आलेली ही व्यक्ती आहे. त्यांनी देशासाठी अनेक गोष्टी केल्या हा देश सामर्थ्यवान बनावा त्यासाठी ही त्यांनी अनेक उपक्रम त्यांच्या कारकिर्दीत राबवले आहे. असे एकमेव पंतप्रधान असेल की, ज्यांच्यावर कुठलाही भ्रष्टाचाराचा, घोटाळ्याचा आरोप नाही. अतिशय निष्कलंक आयुष्य त्यांनी जगले आहे. मा.श्री.अटल बिहारी वाजपेयी यांच्या सारखा नेता या देशामध्ये होणे शक्य नाही. देशातील प्रत्येक व्यक्तीला अटलजी जाण्याचे दु:ख झाले आहे. अटलजी भारतीय जनता पार्टीचे जरी असले तरी या देशातील कुठल्याही पक्षाला ते परके वाटले नाही. ज्या-ज्या वेळेस त्यांनी सरकारे स्थापन केली त्या-त्या वेळेस ते कधी ही बहुमतात नव्हते. अनेक विरोधकांच्या मनात सुध्दा त्यांनी घर करुन ठेवले होते. अशा पध्दतीचा एक थोर नेता देशाचा अभिमान भारतरत्न मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे दु:खद निधन झाले. मी माझ्या वैयक्तिक पातळीवर माझ्या पक्षातर्फे, कुटूंबीयातर्फे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अपर्ण करत असतांना सभागृहातर्फे ही मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी भावपुर्ण श्रध्दांजली अपर्ण करावी. अशा पध्दतीची विनंती करतो.

श्री.सय्यद मतीन :जो माजी पंतप्रधान यांचा श्रध्दांजलीचा प्रस्ताव आला. त्यास आमचा विरोध आहे. आजपर्यंत बाबरी मस्जीदला आम्ही विसरलो नाही. आमचा विरोध नोंदवावा.

श्री.रावसाहेब आमले :जातीवादाचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे.

श्री.रामेश्वर भादवे :त्यांना कायम स्वरूपी निलंबीत करावे.

मा.महापौर :श्री.सय्यद मतीन यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते. सभा पाच मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.(वेळ दु.१.५३ वाजता पुन्हा सभा १.०० सुरू)

(या वेळी स.सय्यद मतीन सभागृहा बाहेर जातात.)

यानंतर सभागृहात श्री.रेणुकादास वैद्य, श्रीमती माधुरी देशमुख, श्रीमती शोभा बुंराडे श्रीमती अर्चणा निळकंठ, श्री.सचिन खैरे, श्री.प्रमोद राठोड, श्री.गजानन बारवाल, श्री.मोहन मेघावाले, श्रीमती सीमा खरात, श्रीमती शिल्पाराणी वाडकर, श्रीमती सुनिता आऊलवार, श्री.राजगौरव वानखेडे श्रीमती शिंदे किर्ती, श्रीमती जयश्री कुलकर्णी, श्रीमती स्वाती नागरे, श्रीमती मनीषा मुंढे, श्रीमती सुरेखा सानप, श्रीमती कमल नरोटे, श्रीमती ज्योती अभंग, श्रीमती ज्योती पिंजरकर, श्री.गजानन मनगटे, श्री.राजेंद्र जंजाळ, श्री.रामेश्वर भादवे, श्री.दिलीप थोरात, श्री.विकास जैन यांचेसह इतर काही सदस्यांनी मा.पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे दु:खद निधनामुळे श्रध्दांजली अर्पण करण्याबाबत भावना व्यक्त केल्या. तसेच सदस्य श्री.सय्यद मतीन यांचे सभासदत्व कायम निलंबीत करावे व त्यांना यापुढे सभागृहात प्रवेश देऊ नये. अशी काही स.सदस्य मागणी करतात व सभागृहात झालेल्या या घटनेचा निषेध करतात.

**<u>विषय क्रमांक ६४०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १७.०८.२०१८ रोजी समांतर जलवाहिनी प्रकल्प पुनरुज्जीवन करणे बाबत सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. तथापी, या देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे गुरुवार दिनांक १६.०८.२०१८ रोजी निधन झाले असल्याने सदरील सभेत समांतर जलवाहिनी विषयावर कोणत्याही प्रकारची चर्चा न करता सर्वानुमते माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेला असतांना सर्व स.सदस्य माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे विषयी आपआपले मते मांडून आदरांजली अर्पण करीत होते. सर्व शांततेत सुरु असतांना व स.सदस्य आप आपल्या भावना व्यक्त करित असतांना प्रभाग क्रमांक-२० चे नगरसेवक श्री.सय्यद मतीन रशीद यांनी आदरांजलीस आक्षेप घेऊन आम्ही बाबरी मशिद प्रकरण विसरलो नाहीत. सदरील श्रध्दांजलीच्या प्रस्तावास माझा विरोध आहे. अशा प्रकारे दोन समाजात तेढ निर्माण करणारे तसेच स्वातंत्र्य सैनिक आणि देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा अपमान करणारे देशद्रोही व्यक्तव्य केले. तसेच त्यांनी अपशब्द वापरले व अश्लील व्यक्तव्य केले. याची तात्काळ गंभीर दखल घेण्यात यावी. यापुर्वीही संबंधीताने वंदेमातरम् गीताचा अवमान केला आहे. तसेच सभागृहात खुर्च्या फेकून सुरक्षा रक्षकाला मारहाण करण्याचा प्रयत्न केला आहे. या दोन्ही गैर वर्तनुकीत संबंधीताचे सदस्यत्व रद्द करण्यात आले होते. वारंवार सदस्यत्व रद्द करण्याचे कार्यवाही यापुर्वी बरेचदा होऊन देखील त्यांनी सवयीनुसार दोन समाजात तेढ निर्माण करणारे व शोकसभेत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा अपमान करणारे व्यक्तव्य केले असल्याने मुंबई महानगरपालिका गैरवर्तनुक कायद्या अंतर्गत श्री.सय्यद मतीन

रशीद यांचे सदस्यत्व कायमस्वरुपी रद्द करण्यात यावे व तशी शिफारस व अहवाल शासनाकडे पाठविण्यासह संबंधीत नगरसेवकास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रवेश बंद करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.रेणुकादास (राजु) वैद्य दत्तोपंत, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ,

**अनुमोदकः-** श्री.राजगौरव हरिदास वानखेडे, श्री.विकास रतनलाल जैन, श्री.दिलीप थोरात, श्रीमती माधुरी मिलींद देशमुख, श्रीमती शिल्पाराणी वाडकर, श्री.रामेश्वर बाबुराव भादवे

मा.महापौर :अत्यंत घृणास्पद प्रकार सभागृहात झाला देश दुःखात बुडालेला असलेला असतांना या शहरातील नागरीकांना खाली मान टाकण्याची वेळ एका घाणेरडया प्रसंगामूळे आली आहे. शत्रुवर प्रसंग आला तरी त्यामध्ये धावुन जाण्याची वृत्ती या देशवासीयांची आहे. त्यालाच देशभक्ती, देशप्रेम व बंधुत्व म्हणतात. त्याचे भान काही लोक विसरून गेले. झालेल्या घटनेचा निषेध करतो. असा प्रकार घडावा हे योग्य नाही. सर्वानी निषेध केला. त्या पलीकडचीही ही घटना आहे. जनता बघेल तेही माफ करणार नाही. अनेक सदस्यांनी भावना व्यक्त केल्या. उद्या समाजा समोर जायचे आहे तर आम्ही काय उत्तर द्यायचे आहे. या घटनेचा निषेध करतो. या प्रकरणात निर्णय देत असतांना स.श्री.सय्यद मतीन यांचे सभासदत्व रद्द केले. असे कितीदा सदस्यत्व रद्द केले ते समोर यावे. ते शासनाच्या निदर्शनास आणून द्यावे. प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्त यांनी यात लक्ष घालण्याची गरज आहे. प्रशासनाने या आधी एकच व्यक्ती देशद्रोहीची भावना करतो वंदेमातरम्‌चा उल्लेख केला. त्यासाठी उभे न रहावे योग्य नाही. ज्या देशात राहतो त्याचे गुणगाण होत असतांना त्याचा निषेध करायचा हे योग्य नाही.

महानगरपालिका महाराष्ट्र अधिनियम प्रकरण २ चे अनुसूची ड मधील कलम २ मधील तरतुदीस अनुसरून तसेच कलम १०(१)अन्वये, आजच्या सभेत भारताचे माजी पंतप्रधान व सर्वांचे श्रध्दास्थान असलेले अटल बिहारी वाजपेयी यांना सभागृहामध्ये श्रध्दांजली अर्पण करण्याचा सदस्यांनी ज्या आपआपल्या भावना व्यक्त करीत असतांना वार्ड क्र.२० चे सदस्य सय्यद मतीन रशीद यांनी स्व.अटल बिहारी वाजपेयी यांचे श्रध्दांजलीच्या कार्यक्रमास विरोध दर्शवून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि एक महान व्यक्तीच्या बाबतीत या ठिकाणी अनादर झाला. असे वक्तव्य करणे ही बाब असभ्य आहे. कधी ही कोणीही नागरीक त्यास माफ करू शकणार नाही. या सभागृहात प्रकार झाला तो योग्य नाही, त्या सदस्यांला यापूढे आले तर वातावरण खराब होऊ शकते असे सदस्यांचे मत आहे. माफ न करणारा गुन्हा त्यांनी केला त्यामूळे त्यांचे कायमस्वरूपी सभासदत्व रद्द कसे करता येईल तसा प्रस्ताव मा.आयुक्तांना सुचना देण्यात येते की, तसा प्रस्ताव शासनाला पाठवावा. त्यांना सभागृहात येण्यासाठी प्रतिबंध करावे तशा सुचना सुरक्षा अधिकारी यांना द्याव्यात. त्यांना सभागृहात प्रवेश देऊ नये सर्व सदस्यांनी श्री.सय्यद मतीन रशीद यांना हद्दपार तडीपार करणे बाबत मागणी केली. त्यानुसार सर्व मा.विभागीय आयुक्त व पोलिस आयुक्त यांना एक निवेदन देऊन त्या बाबतची मागणी करण्यात येईल. कडक कार्यवाही करण्याची मागणी

करू भारत देशाचे महान नेते भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी यांचे दु:खाने भावना व्यक्त केल्या. अशा प्रकारच्या घटनेचे निमित्त साधून हे सदस्य वातावरण खराब करीत असतो. त्याचे पक्षाचे नेते यांनी सुध्दा चिड निर्माण केली आहे. आपल्या सोबत ते असल्याचा निरोप आलेला आहे. सय्यद मतीन रशीद यांच्यावर कठोर व्हावी, यासाठी कायदेशीर बाबी सचीव यांनी तपासून घ्यायच्या आहे. हे सभागृह पवित्र आहे अशा प्रकारे वक्तव्य कोणी करीत असेल तर योग्य नाही. ते निषेधार्थ आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ चे अनुसूची ड मधील कलम २ मधील तरतुदीस अनुसरून तसेच कलम १०-१ अन्वये श्री.सय्यद मतीन रशीद यांचे कायम स्वरूपी सदस्य पद रद्द करणे बाबतचा ठराव मंजूर करण्यात येतो. सदस्याच्या भावना लक्षात घेता कलम (१०)(१-१- अ) मधील तरतुदी नुसार श्री.सय्यद मतीन यांचे पालिका सदस्य कायमस्वरूपी रद्द करण्या बाबतचा ठराव एक मताने मंजूर करण्यात येतो. मा.आयुक्त यांनी कायदेशीर बाबी पुर्ण कराव्यात हा ठराव शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावा. त्यामध्ये श्री.सय्यद मतीन यांनी मनपामध्ये जे गैरवर्तणुक केली त्यांचेवर आयुक्त म्हणून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याचा ठराव मंजूर करण्यात येतो. असा ऐनवेळीचा ठराव सुध्दा मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या निर्णयानुसार समांतर जलवाहिनी या विषयावर विचार विनिमय करण्यासाठी महानगरपालिकेची पुर्वनियोजीत सर्वसाधारण सभा दिनांक १७.०८.२०१८ रोजी आयोजीत करण्यात आलेली होती. तथापी, दिनांक १६ ऑगस्ट रोजी भारताचे पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे दु:खद निधन झाले. दिनांक १७.०८.२०१८ रोजी समांतर पणी प्रश्नी नियोजीत सभेत आदरांजली वाहण्याच्या कार्यक्रम नियोजीत करण्यात आला होता. त्यावेळी सभागृहात उपस्थित स.सदस्य स्वर्गीय वाजपेयीजींना श्रध्दांजलीवर भाषन करून आपआपल्या भावना व्यक्त करीत होते. यावेळी वॉर्ड क्र.२० चे नगरसेवक श्री.सय्यद मतीन रशीद यांनी श्रध्दांजली प्रस्तावास विरोध दर्शविला आणि श्री.वाजपेयी यांच्या बद्दल आक्षेपार्ह उद्गार काढले. ज्यामुळे सभेत गोंधळ निर्माण झाला आणि सभा ५ मिनीटाकरीता तहकुब करावी लागली. तद्नंतर त्यांच्या समर्थकांनी बाहेर मनपा मुख्यालयातील आवारात असलेल्या वाहनांची तोडफोड केली असल्याचे समजले.

आदरांजली वाहण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी संबंधीताने राष्ट्रपुरुषाचा माजी पंतप्रधानांचा केलेला अपमान हा घृणास्पद आहे. तसेच नगरसेवक पद धारण केलेले असतांना केलेले वर्तन अशोभनिय आहे. महानगरपालिका सर्वसाधारण सभेचे सभागृह हे लोकप्रतिनीधीचे व्यासपीठ असून लोकभावनांचा आदर राखणे आद्यकर्तव्य आहे. नागरीकांमध्ये अशा पध्दतीच्या वर्तनामुळे चुकीचा संदेश जात असतो.

पीठासीन अधिकारी म्हणून महापौरांनी वारंवार ताकीद दिल्यानंतर देखील गोंधळ घातला. त्यामुळे नगरसेवक श्री.सय्यद मतीन रशीद यांस सभेतून निलंबीत केल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी महापालिकेच्या प्रवेशद्वारावर जमाव बोलवून चारचाकी वाहनांवर दगडफेक केली. संबंधीताने केलेले वर्तन हे नगरसेवक पदधारण करीत असतांना केलेले अशोभनिय बेशिस्तपणाचे आहे.

संबंधीत नगरसेवकाने यापूर्वी दिनांक १९.०८.२०१७ रोजीच्या सर्वसाधारण सभेत वंदेमातरम् हे राष्ट्रीय वंदन म्हणण्यास विरोध केला. ज्या विरुध्द सिटीचौक पोलिस स्टेशन येथे एफआयआर नं.३०२

दि.२४.०८.२०१७ रोजी भारतीय दंड संहिता १९८० च्या कलम ३२३,५०४ व ३४ तोडफोडी बद्दल प्रिव्हेंशन ऑफ डॅमेज टु पब्लिक प्रॉपर्टी ॲक्ट १९८४ चे कलम ३ व ४ अंतर्गत गुन्हा नोंदविला. ज्याच्या अंतर्गत त्यास अटक होऊन त्यास १४ दिवसांची पोलिस कोठडी सुध्दा मिळाली होती. ही वस्तुस्थिती आहे.

तसेच दिनांक १७.१०.२०१७ च्या सर्वसाधारण सभेत पाण्याच्या विषयावर चर्चा चालु असतांना संबंधीत नगरसेवकाने सभागृहात खुर्च्या फेकून सुरक्षा अधिकाऱ्यांना मारहाण केली होती. सभागृहात दहशत निर्माण केली होती व गोंधळ घालून महापौरांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला होता. ज्या विरुध्द दिनांक १७.१०.२०१८ रोजी सिटी चौक पोलिस स्टेशनला भारतीय दंड संहिता कलम ३५३,३२३,५०४,५०६ व ३४ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा नोंदविला गेला आहे. या प्रकरणी श्री.सय्यद मतीन रशीद यांच्यासह तीन नगरसेवकांना मा.न्यायालयाने जामीन नामंजुर केला होता व त्यांना चौदा दिवसांची पोलिस कोठडी सुध्दा सुनावली होती.

सर्वसाधारण सभेच्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३(१)(अ) व १३(२) च्या तरतुदी अंतर्गत शासनाकडे त्यांना पालिका सदस्य म्हणून अनर्ह ठरविण्याकरीता प्रशासनाने कार्यवाही करण्यासाठी पाठवले होते. त्यानुषंगाने प्रशासनाने ठराव शासनाकडे पाठविलेले आहेत. सदरचे ठराव शासन स्तरावर कार्यवाही अंतर्गत आहेत. त्याबाबत सुध्दा मा.शासनाला निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात यावी.

श्री.सय्यद मतीन रशीद यांची अशा प्रकारे वर्तवणुक करणे हे नित्याचेच झालेले आहे. सभागृहात जातीय तेढ निर्माण करणे, सुरक्षा अधिकाऱ्यांना मारहाण, तोडफोड करून सुरक्षा रक्षकांना, नगरसेवकांना इजा पोहचविणे याबाबी पाहता आणि यापुर्वीच्या त्यांच्या विरुध्द दाखल प्रकरणांचा गोषवारा तपासता राष्ट्रपुरुषांचा अपमान करणे, त्यांच्या विषयी आपत्तीजनक भाषा वापरून सर्वसाधारण सभेची कार्यवाही रोखणे, शहरातील वातावरणात अशांतता पसरविणे, दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण करणे या बाबी अत्यंत गंभीर असून लोकसेवकांना शोभणाऱ्या नाहीत. त्यांचे हे वर्तन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०(१-१-अ) च्या तरतुदींचा भंग करणारे आहे. त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यासंबंधी त्यांच्या विरुध्दचे यापूर्वी सभागृहात झालेले निर्णय व त्यांची वर्तणुक पाहता पुन:श्च महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३(१) (अ) अन्वये सय्यद मतीन रशीद यांचे पालिका सदस्यत्व कायमस्वरुपी रद्द करण्याकरीता तसेच सहा वर्षाच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास अनर्ह ठरविण्यात यावे. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. मा.आयुक्तांनी शासनाकडे त्वरीत प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, या देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे गुरूवार दिनांक १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. सर्वात प्रदिर्घ काळ खासदार राहण्याचा विक्रम असलेले एकूण ५० वर्षे खासदारपद भुषविलेले तसेच सन १९५२ ते सन २००८ पर्यंत म्हणजे ५६ वर्षे सक्रिय राजकारणात राहिलेले आणि देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून निर्भयतेने पोखरण येथे अणू चाचणी घेणारे माजी पंतप्रधान आणि नावाप्रमाणेच अटल, अढळ आणि अचल हे कुण्या एका व्यक्तीचे नाव नाही तर ते नाव एका महासागराचे असून ज्यांच्याकडे पाहून राष्ट्रभक्ती या शब्दाचा अर्थ कळतो. ज्यांच्याकडे पाहून राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या स्वप्नपुर्ती अभिलाषा जागी होते. अशा आदर्श, सत्यवचनी, कर्तव्य कठोरपण तितक्याच निर्मळ मनाच्या थोर नेत्याचा आदर्श कायम नजरेसमोर रहावा.

या करीता त्यांचे तैलचित्र महानगरपालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात लावण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे,श्री.राजु रामराव शिंदे

**अनुमोदक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत,श्री.विकास रतनलाल जैन, श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.दिलीप गंगधर थोरात, श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.राजगौरव हरिदास वानखेडे

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे गुरूवार दिनांक १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. सर्वात प्रदिर्घ काळ खासदार राहण्याचा विक्रम असलेले एकूण ५० वर्षे खासदारपद भुषविलेले तसेच सन १९५२ ते सन २००८ पर्यंत म्हणजे ५६ वर्षे सक्रिय राजकारणात राहिलेले आणि देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून निर्भयतेने पोखरण येथे अणू चाचणी घेणारे माजी पंतप्रधान आणि नावाप्रमाणेच अटल, अढळ आणि अचल हे कुण्या एका व्यक्तीचे नाव नाही तर ते नाव एका महासागराचे नाव असून ज्यांच्याकडे पाहून राष्ट्रभक्ती या शब्दाचा अर्थ कळतो. ज्यांच्याकडे पाहून राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या स्वप्नपुर्ती अभिलाषा जागी होते. अशा आदर्श, सत्यवचनी, कर्तव्यकठोरपण तितक्याच निर्मळ मनाच्या थोर नेत्याचा आदर्श कायम नजरेसमोर रहावा. या करीता त्यांचे तैलचित्र महानगरपालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात लावण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी हा वॉर्ड दलित वस्ती असलेला वार्ड असुन सदर वॉर्डात ७०% पेक्षा जास्त दलित लोक राहतात. गेल्या २० वर्षापासून ही वस्ती विकास कामांपासून वंचित आहे.

करीता या भागाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त करणेसाठी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कडे प्रस्ताव मंजुर करून पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामांचे नाव | किंमत रु. |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील सुपर किराणा ते तक्षीला घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६२/- |
| २. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.भीमराव आरक यांच्या घरापासून ते श्री.नितीन कांबळे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६६/- |
| ३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.परमेश्वर गवळी यांच्या घरापासून ते प्रशांत प्रोव्हीजनपर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६६/- |
| ४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.सय्यद शहाबोद्दीन यांच्या घरापासून ते श्री.शेख शकील यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६६/- |
| ५. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर | ३३५८४५/- |

| | | |
|---|---|---|
| | मिसरवाडी येथील श्री.सुभाष बनसोडे यांच्या घरापासून ते श्री.आसिफ शेख यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | |
| ६. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील एस.के.लेबर कॉन्ट्रॅक्टर यांच्या घरापासून ते श्री.शेख अय्युब यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६४/- |
| ७. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.शेख अफसर यांच्या घरापासून ते श्री.फहीम शेख यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६४/- |
| ८. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील हनफिया मस्जिद ते श्री.वसीमभाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६४/- |
| ९. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.शेख मुजाहेद यांच्या घरापासून ते श्री.शेख मतीन यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७६०/- |
| १०. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.शेख बशीर यांच्या घरापासून ते श्री.शेख मोहम्मद यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७६०/- |
| ११. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.इद्रिस हाश्मी यांच्या घरापासून ते श्री.शेख अतिक यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८६२/- |
| १२. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.मजहर पठाण यांच्या घरापासून ते श्री.शेख मुश्ताक यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८६२/- |
| १३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील आमेर किराणापासून ते श्री.समदानी यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९७०/- |
| १४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.भिकन पठाण यांच्या घरापासून ते जमील मस्जिदपर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | १०७९६९/- |
| | **एकूण** | **४४,७४,७८०/-** |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-**श्रीमती संगिता सुभाष वाघुले **अनुमोदकः-**श्री.कादरी जमिर अहेमद रहीम अहेमद

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३४, आरतीनगर,मिसरवाडी या वॉर्डामधील दलित वस्ती मध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी एकूण र.रु.४४,७४,७८०/- चा निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामांचे नाव | किंमत रु. |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील सुपर किराणा ते तक्षीला घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६२/- |
| २. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.भीमराव आरक यांच्या घरापासून ते श्री.नितीन कांबळे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६६/- |
| ३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.परमेश्वर गवळी यांच्या घरापासून ते प्रशांत प्रोव्हीजनपर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६६/- |
| ४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.सय्यद शहाबोद्दीन यांच्या घरापासून ते श्री.शेख शकील यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६६/- |
| ५. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.सुभाष बनसोडे यांच्या घरापासून ते श्री.आसिफ शेख यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८४५/- |
| ६. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील एस.के.लेबर कॉन्ट्रॅक्टर यांच्या घरापासून ते श्री.शेख अय्युब यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६४/- |
| ७. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.शेख अफसर यांच्या घरापासून ते श्री.फहीम शेख यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६४/- |
| ८. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील हनफिया मस्जिद ते श्री.वसीमभाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६४/- |
| ९. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.शेख मुजाहेद याच्या घरापासून ते श्री.शेख मतीन यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७६०/- |
| १०. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.शेख बशीर यांच्या घरापासून ते श्री.शेख मोहम्मद यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७६०/- |
| ११. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.इद्रिस हाश्मी यांच्या घरापासून ते श्री.शेख अतिक यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८६२/- |
| १२. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.मजहर पठाण यांच्या घरापासून ते श्री.शेख मुश्ताक यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८६२/- |
| १३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी | ३३५९७०/- |

| | | |
|---|---|---|
| | येथील आमेर किराणापासून ते श्री.समदानी यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | |
| १४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसरवाडी येथील श्री.भिकन पठाण यांच्य घरापासून ते जमील मस्जिदपर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | १०७९६९/- |
| | **एकूण** | **४४,७४,७८०/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६४३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी हा वॉर्ड दलित वस्ती असलेला वार्ड असुन सदर वॉर्डात ७०% पेक्षा जास्त दलित लोक राहतात. गेल्या २० वर्षापासून ही वस्ती विकास कामांपासून वंचित आहे.

करीता या भागाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त करणेसाठी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कडे प्रस्ताव मंजुर करून पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामांचे नाव | किंमत रु. |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील अनम क्लिनीक ते मोहम्मद रियाजोद्दीन यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८८१/- |
| २. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.शेख अफसर यांच्या घरापासून ते मस्जिद चांदमारी पर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८८१/- |
| ३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.केशव वाघ यांच्या घरापासून ते श्री.जुनेद भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७९१/- |
| ४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.अफसर खान यांच्या घरापासून ते श्री.मिर्झा मोहम्मद अली यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७९१/- |
| ५. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.चुडीवाले यांच्या घरापासून ते खान साहेब यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७९१/- |
| ६. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.आरेफ साहेब यांच्या घरापासून ते श्री.इनामदार शाह यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७६०/- |
| ७. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.फारुक भाई यांच्या घरापासून ते श्री.वडगारे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७६०/- |
| ८. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.हन्नान भाई यांच्या घरापासून ते श्री.जावेद भाई यांच्या घरापर्यंत | ३३५८९८/- |

| | | |
|---|---|---|
| | सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | |
| ९. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.अनवर भाई यांच्या घरापासून ते श्री.पाशा भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५९६२/- |
| | **एकुण** | **३०,२२,५१५/-** |

**सुचकः-** श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद **अनुमोदकः-**श्रीमती शेख समिना शेख इलियास
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील दलित वस्ती मध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी एकूण र.रु. **३०,२२,५१५/-** चा निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामांचे नाव | किंमत रु. |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील अनम क्लिनीक ते मोहम्मद रियाजोद्दीन यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८८१/- |
| २. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.शेख अफसर यांच्या घरापासून ते मस्जिद चांदमारी पर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८८१/- |
| ३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.केशव वाघ यांच्या घरापासून ते श्री.जुनेद भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७९१/- |
| ४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.अफसर खान यांच्या घरापासून ते श्री.मिर्झा मोहम्मद अली यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७९१/- |
| ५. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.चुडीवाले यांच्या घरापासून ते खान साहेब यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७९१/- |
| ६. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.आरेफ साहब यांच्या घरापासून ते श्री.इनामदार शाह यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७६०/- |
| ७. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.फारुक भाई यांच्या घरापासून ते श्री.वडगारे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५७६०/- |
| ८. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील श्री.हन्नान भाई यांच्या घरापासून ते श्री.जावेद भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | ३३५८९८/- |
| ९. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१७, न्यु नंदनवन कॉलनी येथील | ३३५९६२/- |

| | | |
|---|---|---|
| | श्री.अनवर भाई यांच्या घरापासून ते श्री.पाशा भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधणे. ता.जि.औरंगाबाद | |
| | **एकूण** | **३०,२२,५१५/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०९ मधील शगुन अपार्टमेंट समोरील रस्त्याचे कॉंक्रीटींगच्या कामाच्या निविदेस मंजुरी मिळालेली आहे. तरी हा स्थळबदल करावयाचा रस्ता त्याच कंत्राटदाराकडून मंजुर दरानूसार करून घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

आर्थिक तरतुद (Zone-08-Spill-P.No.220, Sr.No.70, तरतुद १२ लक्ष)

| मंजुर निविदा | स्थळ बदल |
|---|---|
| वॉर्ड क्र.१०९ अंतर्गत शगुन अपार्टमेंट समोरील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे.<br>अ.प.रक्कम रुपये - १०,१२,६५३/- | वॉर्ड क्र.१०९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे.<br>अ.प.रक्कम रुपये - १०,१२,६५३/- |

**सुचक:-** श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे **अनुमोदक:-** श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०९ मधील शगुन अपार्टमेंट समोरील रस्त्याचे कॉंक्रीटींगच्या कामाच्या ऐवजी वॉर्ड क्र.१०९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट करण्याचे काम मुळ कंत्राटदारां मार्फत मंजुर निविदा दरानुसार करून घेण्यास मंजुरी देण्यात येते.

| मंजुर निविदा | स्थळ बदल |
|---|---|
| वॉर्ड क्र.१०९ अंतर्गत शगुन अपार्टमेंट समोरील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे.<br>अ.प.रक्कम रुपये - १०,१२,६५३/- | वॉर्ड क्र.१०९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट करणे. अ.प.रक्कम रुपये - १०,१२,६५३/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद